| | | |
|---|---|---|
| | अहमदनगर जिल्हा परिषद<br>आरोग्य विभाग<br>जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर | |
| वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र<br>दुरध्वनी क्रमांक वैयक्तिक :-<br>कार्यालय :- | ९४२२२३३५१०<br>०२४१-२४३०५४४ | जिल्हा प्रशिक्षण केंद्र<br>सिव्हिल हॉस्पिटल<br>कंपाऊंड,अहमदनगर |
| Email-id | dttnagar@rediffmail.com | |
| जा.क्र./जिप्रके अ.नगर/चहा,जेवण,नाष्टा दरपत्रके /७५१९-२२/२०२३ | | दि. २०/०३/२०२३ |

२४/०३/२०२३

प्रति,

..................................

..................................

..................................

**विषय :- जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर या संस्थेसाठी चहा,नाष्टा व जेवण पुरवठा करणे दरपत्रक पाठविणेबाबत....**

**संदर्भ :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडील मंजुर टिपणी दि.२४/०१/२०२३**

उपरोक्त विषयान्वये जिल्हा प्रशिक्षण केंद्र व आरोग्य विभाग जिल्हा परिषद अहमदनगर करीता सन.२०२२-२३ या कालावधीत प्रशिक्षणार्थींना व सभेस उपस्थित असणा-या अधिकारी व कर्मचारी यांना चहा,नाष्टा व जेवण पुरवठा करणे करीता अधिकृत विक्रेता व पुरवठादार यांचे कडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सन.२०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या प्रशिक्षणाच्या मंजुर पीआयपी नुसार प्रशिक्षणासाठी उपस्थित प्रशिक्षणार्थींकरीता देण्यात येणा-या चहा,नाष्टा व जेवण यासाठी अंदाजे खर्च रक्कम रुपये **८,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये आठ लक्ष मात्र)** अपेक्षित आहे. तरी जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर येथे प्रशिक्षणार्थींकरीता पुरविण्यात येणा-या चहा,जेवण व नाष्टा यासाठी स्थानिक व्यवसायिंकांकडुन दरपत्रके मागविणेसाठी अनुमती मिळालेली आहे.

तरी आपण आपल्या फर्मच्या नावे मागविल्याप्रमाणे सर्व दर भरुन दरपत्रक जिल्हा वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र.अहमदनगर यांचे नावे बंद पाकिटामधुन आठ दिवसाचे आत वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद सिव्हील हॉस्पीटल कंपाउंड अहमदनगर यांचेकडे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सादर करावे.

**लिफाफा क्रमांक १ :- तांत्रिक लिफाप-यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे.**

१) पॅनकार्ड
२) संस्था असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची प्रत आवश्यक.
३) GST नोंदणी प्रमाणपत्र
४) GST थकबाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र दि. ३१/०३/२०२२ अखेर GST Challan.
५) आयकर थकबाकी नसल्याबाबतचा दाखला (आय.टी.सी.सी.) Income tax clearance दि. ३१/०३/२०२२ अखेर.
६) शासकिय अनुभव किमान ३ वर्षाचा असावा.
७) शासकिय संस्थेस आहार पुरवठा अनुभव प्रमाणपत्र व याबाबत Bank Statement showing at least 5 lakh trasaction.
८) अन्न व औषध प्रशासन विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र दि.३१/०३/२०२२ अखेर अद्यावत.
९) निविदा स्विकारल्याच्या दिनांकापासुन ८ दिवासांच्या आत करार पत्र रु.१००/- कोर्ट फी स्टॅम्प पेपर करावे लागेल. तसेच नियमाप्रमाणे पुरवठा करावयाच्या किंमतीच्या ५ टक्के अनामत रक्कम **रु.४०,०००/- सुरक्षा ठेव (विना व्याज मुदत ठेव पावती स्वरुपात)** म्हणनु वैद्यकिय अधिकारी,जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर यांचे नावे मुदत ठेव पावती कार्यालयास जमा करावी लागेल.
१०) निविदा धारक अहमदनगर जिल्हयातील असावा (आधारकार्ड जोडावे), स्वत:चे किचनशेड असणे आवश्यक आहे.
११) बंधपत्र

**अर्टी व शर्ती :-**

१) पुरवठा आदेश मिळाल्यापासुन दिलेल्या मुदतीत साहित्य स्वखर्चाने कार्यालय सांगेल तसे व तिथे पोहोच करावे लागेल.
२) निविदा धारकाने सादर केलेले दर हे पुरवठा आदेश दिनांकापासुन १ वर्षापर्यंत स्विकृतीस पात्र ठरतील.
३) अंदाजीत दर्शविलेल्या अन्नपुरवठा खरेदी कमी किंवा जास्त होण्याची शक्यता आहे अगर काहीच खरेदी होणार नाही.
४) चहा, जेवण व नाष्टा खरेदी करणेंबाबतचा दर देखील यामध्ये भरण्यात यावे.
५) निविदा कराराबाबतच्यासर्व सुचना व अटी काळजीपुर्वक वाचाव्यात आणि त्याप्रमाणेच निविदा भराव्यात नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार मान्य करण्यात येणार नाही.
६) निविदा उघडतेवेळी निविदेमधील अटी व शर्तीप्रमाणे सर्व कागदपत्रे या कार्यालयाच्या मागणीप्रमाणे अद्यावत असलेबाबतची खात्री करुन घेतल्यानंतर दरांबाबत विचार केला जाईल. लिफाप्यामध्ये काही कागदपत्रे अपुर्ण अथवा कमी आढळुन आल्यास दराचा विचार केला जाणार नाही.स्पर्धकाची निविदा रद्द केली जाईल सर्व कागपदत्र पुर्ण असल्यानंतरच दराबाबत विचार केला जाईल.
७) ई-निविदेतील अटी व शर्तीमध्ये बदल अथवा शिथिल करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.
८) कोणतेही कारण न दाखविता निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना राहील.तसेच याबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. याबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास सदर प्रकरण अहमदनगर येथील न्यायालयातच दाखल होऊ शकते.

**लिफाफा क्रमांक २ :- आर्थिक लिफाप-यामध्ये खालील खाद्यपदार्थाचे दर सादर करावे.**

९) पुरवठा करावयाचे जेवण,चहा,व नाष्टा यांचा तपशिल पुढीलप्रमाणे.

दर :- २ वेळेस चहा, १ वेळेस नाष्टा व २ वेळेस जेवण (अमर्यादित) याकरीता रक्कम रुपये १५०/- या प्रमाणे प्रशिक्षणासाठी अनुदान प्राप्त असते.

| अ.नं. | बाब | पदार्थाचे नांव | दर |
|---|---|---|---|
| १ | चहा | १. चहा १ कप | |
| | | २. कॉफी १ कप | |
| २ | नाष्टा | नाष्टा १५० ग्रॅम १ प्लेट | |
| | | १) पोहे - १ प्लेट | |
| | | २) उपमा - १ प्लेट | |
| | | ३) मेदुवडा सांबर - २ नग | |
| | | ४) भजी - १ प्लेट व पाव २ | |
| | | ५) बटाटे वडा - १ नग व पाव २ | |
| | | ६) इडली चटणी सांबार - ३ इडली व १ वाटी चटणी/सांबार | |
| | | ७) पावभाजी - १ प्लेट २ पाव | |
| | | ८) समोसा - २ नग | |
| | | ९) साबुदाना वडा - चटणी | |
| ३ | दुपारचे जेवण | जेवण **शाकाहारी अमर्यादित** (प्रती ताट दर) चपाती, भात, वरण, दोन भाज्या ( एक रस्सा भाजी, एक सुकी भाजी) कोशिंबिर, लोणचे, पापड, चटणी. स्विट डिश १०० ग्रॅम (गुलाबजाम,जिलेबी,लाडु) | |
| ४ | रात्रीचे जेवण | जेवण **शाकाहारी अमर्यादित** (प्रती ताट दर) चपाती, भात, वरण, एक भाजी ( एक रस्सा भाजी किंवा एक सुकी भाजी) लोणचे, चटणी. | |

१०) वर नमुद केल्याप्रमाणेच व दिलेल्या आदेशा प्रमाणे सर्व पदार्थ दुपारच्या व रात्रीच्या जेवणात देणे बंधनकारक आहे. अन्यथा आपली निविदा रद्द करण्यात येईल.

११) निविदा स्विकारल्यानंतर चहा, जेवण, व नाष्टा सुरु करण्याचे आदेश प्राप्त झाल्यापासुन मागणी नुसार जिल्हा प्रशिक्षण केंद्र,एनएचएम विभाग, जिल्हा परिषद मध्ये होणा-या आढावा सभा येथे ठरलेल्या दराप्रमाणेच स्वखर्चाने पुरवठा करावा लागेल अन्यथा आपले टेंडर रद्द करण्यात येईल.

१२) कोणतेही कारण न दाखविता निविदा स्विकारण्याचा व नाकारण्याचा हक्क या कार्यालयाने राखुन ठेवला आहे.

१३) निविदा धारकांचे पदार्थ दर सर्व करासह नमुद करावे.मंजुर दरातील बिलामध्ये शासकिय नियमानुसार कर कपात करण्यात येईल. तसेच सर्व पदार्थांचे दर भरणे आवश्यक आहे.

१४) जेवण,चहा,नाष्टा सुरु झाल्यावर काही तांत्रिक बाबी किंवा जेवण विषयी तक्रार प्राप्त झाल्यास

जेवण, चहा,नाष्टा बंद करण्याचे अधिकारी या कार्यालयास राहील.

१५) निविदांमध्ये दिलेले पदार्थाखेरीज इतर कोणतेही पदार्थ ठेवता येणार नाही.

१६) संस्थेने पुरविलेल्या खाद्य पदार्थीची अन्न व औषध प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी केली जाईल.

१७) जर पुरवठा धारकाने विहित कालावधीत चहा,नाष्टा व जेवणाचा पुरवठा केला नाही तर पुढील कार्यवाहीस पात्र राहील.

१८) पुरवठादार अन्नपदार्थ पुरवठा करण्यास असमर्थ ठरल्यास पुरवठा विहित कालावधीत न केल्यास पुरवठा केलेले अन्नपदार्थ अस्विकृत झाल्यास त्याचे देयक अदा केले जाणार नाही. तर मु.का.अ.जिल्हा परिषद अहमदनगर त्यांना योग्य वाटेल अशा दराने उर्वरित अन्नपदार्थ खरेदी करणेस सक्षम राहतील व सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.

१९) पुरवठा धारकांस देय असलेल्या रकमेमधुन नियमानुसार आयकर/विक्रीकराची वसुली करण्याचे जे दर विहित केलेले असतील त्यानुसार वसुली केली जाईल.

२०) पुरवठा केलेल्या अन्नपदार्थाची मंजुर कलेल्या दराप्रमाणे देयक सादर करावयाचे आहे.या निविदेतील अटी व शर्ती याबाबत कोणत्याही प्रकारचे वाद झाल्यास मा.अध्यक्ष जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी तथा मु.का.अधि.यांचा निर्णय अंतिम राहील.

२१) उपरोक्त सर्व कागदपत्रांची छायांकित प्रत दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या दराव्यतिरिक्त नंतर कोणतेही जादा आकार नंतर अदा केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

२२) लिफाफा क्र.१:- तांत्रिक लिफाफा या मध्ये कागदपत्रे सादर करावी. व लिफाफा क्र.२ :- आर्थिक लिफाफा यामध्ये दर सादर करावे.

(डॉ.विनोद कोकडे)
**वैद्यकिय अधिकारी**
**जिल्हा प्रशिक्षण केंद्र,अहमदनगर**

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर,**

- मा.प्राचार्य,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक
- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर
- मा.जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर